महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर - ४४० ०२२
दुरध्वनी क्र. ०७१२-२८७०१२०/२१ CIN - U85300PN2019NPL187405 ई-मेल - mahajyotingp@gmail.com

जा.क्र.महाज्योती/नागपूर/आस्था/१९४६/२०२६-२७ दि:- २९/१०/२०२६

परिपत्रक

विषय:- JEE/NEET/MHT-CET परीक्षापूर्व प्रशिक्षण २०२६-२८ करिता पात्र विद्यार्थांची Tab वितरणाकरिता निवड यादी.

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात महाज्योती संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या JEE/NEET/MHT-CET परीक्षापूर्व प्रशिक्षण २०२६-२८ करिता विद्यार्थांकडून दि.१७/०४/२०२६ रोजी महाज्योतीच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करून दि.०७/०६/२०२६ रोजी पर्यंत ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते.

सदर प्रशिक्षणाअंतर्गत अर्ज केलेल्या सर्व विद्यार्थांचे ऑनलाईन प्रशिक्षण दि.०८/०६/२०२६ रोजी पासून सुरु करण्यात आलेले आहे, महाज्योती संस्थेमार्फत दि.१४/०७/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या परिपत्रकानुसार जे विद्यार्थी सदर प्रशिक्षणाकरिता नियमितपणे उपस्थित असणार केवळ अशाच विद्यार्थांची Tab वितरणाकरिता निवड करण्यात येईल व प्रशिक्षणाचे लाभ सर्व विद्यार्थांना देण्यात येईल, असे कळविण्यात आले होते.

त्यानुसार विद्यार्थांना इयत्ता १० वी ला प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे व सदर प्रशिक्षणाकरिता नियमितपणे उपस्थित असणाऱ्या विद्यार्थांची JEE/NEET/MHT-CET परीक्षापूर्व प्रशिक्षण २०२६-२८ करिता Tab वितरणासाठी निवड यादी महाज्योती संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

नोट:- १.निवड झालेल्या विद्यार्थांचे आवश्यक ते सर्व कागदपत्रे तपासून Tab वितरण करण्यात येईल.

२.विद्यार्थांनी सादर केलेली माहिती चुकीची आढळून आल्यास अशा विद्यार्थांची निवड रद्द करण्यात येईल.

३.सदर प्रारूप निवड यादी विद्यार्थांना इयत्ता १० वी ला प्राप्त झालेल्या गुणांच्या, Career Point या संस्थेमार्फत प्राप्त झालेल्या अहवालाच्या व नियमितपणे प्रशिक्षणाकरिता हजर असल्याच्या आधारावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

४.निवड झालेल्या विद्यार्थांना Tab वितरणाकरीता Career Point, यांच्या कॉल सेंटर द्वारे दिनांक व वेळ कळविण्यात येईल.

स्वा
(मिलिंद नारिंगे)
व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था,
(महाज्योती) महाराष्ट्र राज्य, नागपूर